# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

---

**दिनांक ०८.१०.२०२६ गुरुवार**

**१) मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ०८.१०.२०२६ रोजी मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश—०२, नागपुर, श्री एस.एच.ग्वालानी साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. ४४७/२०२१ मधील, पोलीस ठाणे लकडगंज येथील अप. क्र. १५/२०२१ कलम ४५७,३८०,४११,४१३,४१६,३४ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी नरेश अंकालु महिलांगे वय ३४ वर्षे, रा. पुंजारामवाडी, डिप्टी सिग्नल, कळमणा, नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ४५७,३४ भा.दं.वि. कायद्यान्वये ०३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महिने अतिरीक्त कारावासाची शिक्षा, तसेच कलम ३८०,३४ भा.दं.वि. कायद्यान्वये ०३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महिने अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत २९ अ, स्माल फॅक्ट्र ऐरीया येथे फिर्यादी मुकेश ओमप्रकाश अग्रवाल वय ५२ वर्ष रा. वर्धमान नगर यांचे गंगा आयर्न अॅन्ड स्टील ट्रेडींग कंपनीचे ऑफीस आहे. फिर्यादी ऑफीस बंद करुन घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने, कंपनीचे खिडकीची लोखंडी ग्रिल तोडून, आत प्रवेश करुन, कॅश काऊंटर तोडून, त्यातील रोख ५,११,२५०/— रुपये चोरुन नेल्याचे दिसुन आले. फिर्यादी यांनी पाहणी केली असता, दिनांक ०९.०१.२०२१ चे ००.५२ ते ०१.५८ वा. चे दरम्यान, चोरी झाल्याचे दिसुन आले होते. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. तपासादरम्यान पोलीसांनी तांत्रिक तपास करुन आरोपीस निष्पन्न केले व तांत्रिक व इतर वैज्ञानिक पुरावे गोळा करुन आरोपीला दिनांक ०३.०२.२०२१ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी सपोनि. राजेंद्र सानप यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून अॅड. श्रीमती साई खेडकर यांनी तर, आरोपीतर्फे अॅड. श्री. ए.जे.मनोहर यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा अमर काळे, नितीन सातपुते व मपोअं. सुशिला धुर्वे यांनी काम पाहिले.

वरील शिक्षा झालेला आरोपी हा घरफोडीचे गुन्हयाचा सराईत आरोपी असुन, त्याचेविरुध्द नागपुर शहर, ग्रामिण तसेच महाराष्ट्रातील इतर जिल्हयांमध्ये एकुण १२० घरफोडीचे तसेच शरीराविरुध्दचे गुन्हे दाखल आहेत. आरोपीवर यापुर्वी हद्दपार, एमपीडीए तसेच मकोका अंतर्गत प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे. लकडगंज पोलीसांनी तपासामध्ये सुक्ष्म विश्लेषण करुन, सीए रिपोर्ट व इतर पुरक पुरावे यांचा प्रभावी वापर करुन, आरोपी विरुध्द ठोस पुरावे गोळा करुन, दोषारोपपत्र सादर केले होते. आरोपी हा बंद घरे हेरुन, मोठया प्रमाणात सलग घरफोडया करण्याचे व घरफोडीतील रोख रक्कम व मौल्यवान वस्तु घेऊन पोलीसांची नजर चुकविण्यासाठी दुसऱ्या जिल्हयात जाऊन राहत होता. अशी त्याची मोडस ऑपरेंडी होती.

मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांनी वरील गुन्हयाचा उत्कृष्ट तपास करुन दोषारोपपत्र सादर करणारे तसेच कोर्ट पैरवी अधिकारी व अंमलदार यांना रोख २५,०००/— रु. चे प्रोत्साहनपर बक्षिस जाहीर केले आहे. नागपुर शहर पोलीसांची नागरिकांच्या जिवीत व मालमत्तेचे संरक्षण करणे ही सर्वोच्च प्राथमिकता असुन त्याकरीता पोलीस सदैव तत्पर आहेत. तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीविरुध्द कठोर कारवाई करण्यास कटीबध्द आहे. नागरिकांनी कोणतीही संशयास्पद अथवा गुन्हेगारी बाब निदर्शनास आल्यास घाबरुन न जाता, अविलंब पोलीसांना माहिती द्यावी.

२) **मा. न्यायालयातुन आरोपीला २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ०८.१०.२०२६ रोजी मा. अति. सत्र न्यायाधीश—१८, तथा तदर्थ विशेष न्यायाधीश पोक्सो कोर्ट, नागपुर, श्री. जयवंत सी .यादव साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. १२७/२०१८ मधील, पोलीस ठाणे नंदनवन येथील अप. क्र. ३८०/२०१७ कलम ३७६(२)(१) भादंवि सहकलम ३,४,५,६ पोक्सो या गुन्ह्यातील आरोपी छबिराम गुरुराम देवांगन वय ३९ वर्षे, रा. मोहरेंगा, ता. बेमेतरा, छत्तीसगढ ह.मु. बिट्टु शाहु धरमकाटा दुकानाचा पहिला माळा, बिडगाव, नंदनवन, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ६ पोक्सो कायद्यान्वये २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व २५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्ष अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा, तसेच कलम ३७६(२)(१) भादंवि कायद्यान्वये २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व २५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्ष अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक ०५.१०.२०१७ चे १६.०० ते १९.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत राहणाऱ्या फिर्यादीचे ०३ वर्षीय अल्पवयीन मुलीला पाणी आणण्याचे बहाण्याने नेऊन तिचेसोबत आरोपीने जबरीने अतिप्रसंग केला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीस दिनांक १७.०५.२०१८ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोउपनि. एस.एच.चव्हाण यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती दिपीका गौरी यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. पराग बेसलवार यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. अलका ढेंगरे, पोअं. अमोल कोठीया यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**१) यशोधरानगर पोलीसांची कामगीरी :— बॅटरी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २८.०८.२०२६ चे १८.०० वा. ते दि. २९.०८.२०२६ चे ०४.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी रविराज नारायण वानखेडे वय ४१ वर्षे, रा. संजय गांधी नगर, भिम उद्यान समोर, नेहरु कॉन्व्हेंटचे बाजुला, नागपूर यांनी त्यांचे ई—रिक्षा वाहन क्र. एम.एच. ४९ एआर ९७२८ ही चार्जींगकरीता लावली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे ई—रिक्षातील वेगवेगळया कंपनीच्या ०४ बॅटरी कि. २०,०००/— रु. चा मुद्देमाल काढुन चोरुन नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासात पोलीस ठाणे यशोधरानगर पोलीसांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून आरोपी नामे क्र. १) अब्दुल इरफान अब्दुल इब्राहीम वय २४ वर्षे, रा. गल्ली क्र. ८, बंदेनवाज नगर, यशोधरानगर २) इब्राहीम खान कादर खान वय २७ वर्षे, रा. महेंद्रनगर पाण्याचे टाकीजवळ, पाचपावली, नागपूर यांना ताब्यात घेऊन विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा संगणमत करून केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन ०४ बॅटरी व गुन्हा करताना वापरलेली सुझुकी ॲक्सेस मोपेड

क्र. एम.एच. ४९ बीएफ ८०२० असा एकुण ४०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. युनुस चांद शेख, पोउपनि. अनंत पाटील, पोहवा. राहुल बोंद्रे, पोअं. मनिष झरकर, संदीप वानखेडे, क्षितेश चौरसिया, भुषण येरोजवार यांनी केली.



**<u>२) तहसिल पोलीसांची कामगिरी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपींविरुध्द गुन्हा दाखल</u>**

दिनांक ०७.१०.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, तहसिल पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, शिवाजी नाईट स्कुलमागे, धोंडबा चौक येथे गोवंशीय जनावरांना बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मोहम्मद ईस्राईल कुरैशी याचे राहते घरी तळमजल्यावर एका बंद खोलीत एकुण ०७ गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेले मिळुन आले. नमुद जनावरांचा मालकाबाबत माहिती काढली असता, जनावरे हे १) मोहम्मद ईस्राईल हाजी गुलाम रसुल कुरैशी वय ६० वर्षे २) मोहम्मद फुरकान इसराईल कुरैशी वय ३० वर्षे दोन्ही रा. घटनास्थळी, यांचे असल्याचे सांगितले. आरोपींनी गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळाहुन एकुण ०७ गोवंशीय जनावरे व ईतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे १,२०,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गौरक्षण केंद्र, धंतोली, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे तहसिल येथे पोअं. सचिन जैस्वाल यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दोन्हीही आरोपीविरूध्द कलम ११२,३(५) भान्यासं. सहकलम ५,५(ब),९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग), वपोनि. संजय मेंढे यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. मनिष शाहाकार, कुलदीप गडम, सफौ. अनिल ठाकुर, पोहवा उमाकांत नागदिवे, पोअं. संजय तिवारी व सचिन जैस्वाल यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे खापरखेडा :— जिवे ठार मारणारा आरोपी अटकेत.</u>**

पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत वार्ड क्र. ३, चिचोली, जिल्हा परिषद शाळेजवळ, ता. कामठी, जि. नागपुर येथे राहणारे फिर्यादी यांचे घराजवळ राहणारे धमेंद्र धनिराम कापसे वय ५९ वर्ष व त्यांची पत्नी सौ.

अनिता कापसे हे दोघे दिनांक ०८.१०.२०२६ चे ०९.२५ वा. चे सुमारास, फिर्यादीचे घराशेजारी राहणारे मोठे भावाचे घराचे अंगणात बसलेले असता, धमेंद्र कापसे यांचा मुलगा आरोपी अंकित धमेंद्र कापसे वय ३० वर्ष याने तेथे येऊन त्याचे वडीलांना ' तु येथे का बसला आहे, आपले घरी चाल' असे म्हटले. धमेंद्र कापसे यांनी त्याचेसोबत घरी जाण्यास नकार दिल्याने, आरोपीने भांडण करुन त्यांना थापडा मारुन रागाचे भरात घरी गेला व आपले सोबत एक लोखंडी सळई आणुन वडीलांना शिवीगाळ केली व त्यांचे डोक्यावर सळईने मारुन गंभीर जखमी केले. व पळुन गेला. गंभीर जखमी धमेंद्र कापसे यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी गुणवंता सिताराम राऊत वय ४० वर्ष रा. वार्ड क्र. ३, चिचोली, जिल्हा परिषद शाळेजवळ, खापरखेडा, ता. कामठी जि. नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोउपनि अमोल पाटील ९२०९९२३५४४ यांनी आरोपीविरुध्द कलम १०३(१) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद केला. पोलीसांनी आरोपीचा शोध घेवुन त्यास अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे तहसील :—शस्त्र बाळगुन धुमाकुळ घालणाऱ्या हद्दपार आरोपीस अटक.**

दिनांक ०७.१०.२०२६ चे १८.३५ वा. चे सुमारास, तहसील पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मेयो हॉस्पिटल गेटसमोर, गोलुचे चहाचे टपरीसमोर सार्वजनिक रोडवरे एक इसम हातात चाकु घेवून येणारे जाणारे लोकांना चाकुचा धाक दाखवित असतांना दिसुन आला. त्याचे जवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळत असतांना, त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील चाकु काढून घेवून, त्यास नि:शस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद सोहेल उर्फ चाकु उर्फ कुत्ताखाऊ वल्द मोईनुद्यीन अन्सारी वय २७ वर्षे रा. डोबीनगर, अन्सारनगर, मोमीनपुरा, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातून एक लोखंडी चाकु किंमती २००/— रू. ची जप्त करण्यात आला. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास मा. पोलीस उपायुक्त, परि.क्र. ३, नागपूर शहर यांचे हद्दपार आदेश क्र. ०८/२०२५ तामिल दिनांक १६.०२.२०२६ नुसार नागपूर शहर व ग्रामिण हद्दीतुन हद्दपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी हा हद्दपार असतांना, कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून धूमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी सफौ. अनिल ठाकुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसील येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १४२, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— हयगयीने मृत्युस कारणीभुत. आरोपीविरुध्द गुन्हा दाखल. .**

पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, प्लॉट क्र. २७, जागृती कॉलनी, एनआयटी गार्डनजवळ, फ्रेन्डस् कॉलनी येथे राहणारे पप्पु सुरेश संत यांचे घरी फिर्यादीचे पती नामे विजेंद्रसिंग अशोकसिंग ठाकुर वय ३६ वर्षे रा. बजरंग सोसायटी, सुरेंद्रगढ, गिट्टीखदान, नागपूर हे घरकाम व साफसफाईचे कामे करीत होते. दिनांक १८.०८.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, पप्पु सुरेश संत हे त्यांचे घराचे पहिले माळयावर राहणाऱ्या किरायेदाराची रुम आतुन लॉक झाल्याने, ते दार उघडण्याकरीता फिर्यादीचे पतीला आपले सोबत घरी घेऊन गेले. फिर्यादीचे पती कंपाऊंड वॉलवर चढुन पहिल्या माळयाचे बालकनीत चढण्याचा प्रयत्न करीत असतांना, खाली पडुन जखमी झाले. घरमालक यांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे दाखल केले होते. तेथुन त्यांना मेडीकल हॉस्पिटल, ट्रामा सेंटर येथे दाखल केले असता, दिनांक १९.०८.२०२६ चे ०१.४० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले होते. प्राप्त सुचनेवरुन पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे अकस्मात मृत्यु दाखल करण्यात आला होता.

अकस्मात मृत्युचे चौकशीदरम्यान, मृतकाची पत्नी फिर्यादी श्रीमती दिपा विजेंद्रसिंग ठाकुर वय ३२ वर्ष यांनी दिलेल्या तक्रारीमध्ये घरमालक पप्पु सुरेश संत यांनी कोणतीही उचित सुरक्षाव्यवस्था न करता, गैरजबाबदारपणे व निष्काळजीपणे फिर्यादीचे पतीस काम करण्यास भाग पाडल्याने, फिर्यादीचे पती पहिले माळयावर वर चढतांना खाली पडुन जखमी होऊन त्यामुळे त्यांचा मृत्यु झाला. मृतकाचे मृत्युस आरोपी घर मालक कारणीभुत आहे. अशा दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. खुशाल राठोड यांनी मालक आरोपीविरूध्द कलम १०६(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे पाचपावली</u> :–** फिर्यादी सौ. मोनिका दिनेश राऊत वय ४७ वर्षे, रा. खाटीक मोहल्ला, स्वामी नगर, ठक्करग्राम, पाचपावली, नागपूर यांनी पोलीस ठाणे पाचपावली येथे तक्रार दिली की, त्यांचे पती नामे दिनेश गोविंदा राऊत वय ५८ वर्ष हे दिनांक २०.०८.२०२६ चे १०.०० पासुन पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतील राहते घरून बेपत्ता झाले आहेत. शोध घेतला असता, मिळून आले नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. **<u>वर्णन</u>** रंग–सावळा, चेहरा–लांबट, उंची–५ फुट ३ इंच, बांधा–सडपातळ, डोळे–काळे, केस–पांढरे, अंगात–पांढरी टी–शर्ट व मोरपंखी रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी बोलतात. ओळख–चालण्यास व बोलण्यास त्रास होतो. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १३८,१४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**<u>२) पोलीस ठाणे जुनी कामठी</u> :–** फिर्यादी प्रविण गौतम गेडाम वय ३२ वर्षे, रा. नागसेन नगर, राजेश किराणाजवळ, कामठी, नागपूर यांनी पोलीस ठाणे जुनी कामठी येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी नामे सौ. प्रियंका प्रविण गेडाम वय ३१ वर्षे ह्या दिनांक २९.०९.२०२६ चे ११.०० वा. पासुन राहते घरून कुठेतरी निघुन गेली असुन, बेपत्ता आहे. शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग–सावळा, चेहरा–गोल, उंची–५ फुट, बांधा–सडपातळ, केस–काळे लांब, डोळे–काळे, अंगात–लाल रंगाचा टॉप व पिवळी लॅगीन घातलेली आहे. भाषा–मराठी/हिंदी बोलतात. ओळख– उजवे हातावर 'प्रविण' नाव गोंदलेले आहे.



दिनेश



सौ. प्रियंका

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य न्याय–दंडाधिकारी, नागपूर | ४३०७/२०१८ | कलम ३२४,५०४ भा.दं.वि. | मुलचंद बागडे रा. प्लॉट क्र. ३५, हनुमान मंदीरजवळ, शिवनगर,बिडगाव, नागपूर | ०९.१०.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | मा. १५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०४०२५१/ १९९७ | कलम ३२४ भा.दं.वि. | मुन्ना छोटेलाल जैस्वाल वय २८ वर्ष रा. लोहापुल झोपडपट्टी, पोलीस ठाणे सिताबर्डी, नागपूर | ०९.१०.२०२६ |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

**<u>''गुन्हयांतील जप्त वाहनांचे जाहीर लिलाव'' बाबत सुचना :—</u>**

मोटार अपघात दावा प्राधिकरण, नागपुर येथे कार्यरत लिपीक दिगंबर भोलानाथ डेरे यांनी मोठया प्रमाणावर आर्थिक अपहार करून खालील नमूद वाहने खरेदी केल्याने त्यांचेविरूध्द पो.ठाणे सदर येथे अनेक गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यापैकी अप क्रं.६६९/२०२३ कलम ४०९, ४११, ४१३, ४१८, ४२०, ४६८, ४७१, ४७७(अ), ३८१, १२०(ब), २०१ भादंवि मध्ये नोव्हेंबर २०२३ मध्ये खालील नमूद वाहने जप्त करण्यात आले आहे, मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश, न्यायालय क्रं. १०,नागपुर शहर यांचे आदेशान्वये आरोपीताकडुन अपहारीत रक्कम वसूल करण्याकरीता जप्त वाहनांची लिलावाव्दारे विक्री करण्यात येणार आहे. सदर वाहनांचा **लिलाव** जसे आहेत, जेथे आहेत, त्या स्थितीत **निविदा** पध्दतीने करण्यात येणार आहे.

सदर वाहने पोलीस मुख्यालय, नागपुर शहर व पोलीस ठाणे सदर चे आवारात ठेवण्यात आले असुन दिनांक ०९.१०.२०२६ ते दिनांक १५.१०.२०२६ पावेतो कार्यालयीन वेळेत सदरची वाहने पहावयास मिळतील.

सदर वाहने लिलाव संबंधी विक्री निविदा फॉर्म, नियम व अटीं, आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस भवन, पाचवा माळा, सिव्हील लाईन, नागपुर येथे कार्यालयीन वेळेत मिळतील. तसेच निविदा फॉर्म मा.पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे अधिकृत वेबसाईट https://nagpurpolice.gov.in/PressRelease.html या वर सुध्दा उपलब्ध आहे. सदर वाहने **''जशी आहेत तशी ''** या तत्तावर **लिलावा**व्दारे विकल्या जाणार आहेत.

सदर जाहिर लिलावाचे अटी व नियम दि.०९/१०/२०२६ पासून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पोलीस कार्यालय, पोलीस भवन, सिव्हील लाईन येथील नोटीस बोर्ड वर सकाळी ११.०० ते १७.०० वा. पर्यत उपलब्ध राहील तसेच सदर जाहिर लिलावाच्या अटी व नियम संबंधीत महानगरपालिका झोन कार्यालय, मोटार परिवहन विभाग कार्यालय, तहसिल कार्यालय/जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर शहर येथे लिलावासंबंधी माहीती उपलब्ध राहील. सदर निवीदा संबंधाने अधिक माहीती करीता पोलीस निरीक्षक श्री. विवेकानंद राऊत, मो.क्र. ७०२८८०८००७ तसेच सफौ. अनिल त्रिवेदी, मो.क्र.९५४५५६५१५६ यांचेशी संपर्क करू शकता.

सदर वाहनांच्या लिलावा संबंधाने कोणतेही कारण न देता जाहिर लिलाव स्थगित किंवा रद्द करण्याचा किंवा इतर कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार वाहन लिलाव समिती कडे कायम राखुन ठेवण्यात आला आहे.

| अ.क्र | वाहन मालकाचे नांव | मॉडेल व खरेदी वर्ष | नोंदणी क्रमांक व विमा | मुल्यांकन |
|---|---|---|---|---|
| 1 | Gopal Datta Jare | **Ashok Layland Truck 3718 BSIV 19.11.2018** | MH49-AT3084 Tata General Insurance 18.10.2023 | 9,55,000/- |
| 2 | Ganga Transport | **Bharat Benz Truck 1415R 01.12.2020** | MH49-AT6927 Tata AIG General Insu 12.11.2023 | 10,35,000/- |
| 3 | Gopal Datta Jare | **Ashok Layland Truck 3718 BSIV 24.08.2018** | MH38- X9190 Tata AIG General Insu 18.10.2023 | 9,05,000/- |
| 4 | Rajshree Dere | **Bharat Benz Truck 3723R 28.11.2018** | MH49-AT9190 Tata AIG General Insu 31.10.2023 | 9,35,000/- |
| 5 | Ganga Transport | **Eicher Truck Eicher Pro 5025LHSD 11.03.2019** | MH49-AT3847 ICICI Lombard 17.02.2023 | 7,05,000/- |
| 6 | Ganga Transport | **Bharat Benz Truck 3723R 28.11.2018** | MH49-AT3686 Tata AIG General Insu 18.01.2024 | 10,45,000/- |
| 7 | Ganga Transport Rajshree Dere | **Mahindra & Mahindra Truck MTB Blazo25 17.12.2018** | MH49-AT3276 Tata AIG General Insu 05.12.2023 | 9,05,000/- |
| 8 | Sachin Gandhare | **Maruti XL-6 Car 10.08.2020** | MH31-FR0681 Upto 2023 | 6,05,000/- |
| 9 | Gopal Datta Jare | **Splendor+ 135 29.01.2021** | MH49-BP7135 Upto Jan -2024 | 32,000/- |
| 10 | Gopal Datta Jare | **Himalayan Royal Enfield 23.06.2022** | MH49-BV3885 Upto June -2023 | 85,000/- |
| 11 | Rajshree Dere | **Jawa 42 Bike 28.06.2021** | MH49-BQ5751 Upto June-2022 | 82,000/- |
| 12 | Ganga Transport Rajshree Dere | **Bharat Benz Truck 1415R 01.12.2020** | MH49AT6928 Tata AIG General Insu 12.11.2022 | 10,15,000/- |
| 13 | Ganga Transport Rajshree Dere | **Tata Motors Tata LPT3518 17.03.2020** | MH49AT6428 Tata AIG General Insu 14.02.2021 | 10,22,000/- |
| 14 | Digamber B. Dere | **Vespa VXL150 30.08.2018** | MH49-BA 4348 Upto August - 2022 | 24,000/- |
|  | बाजारभाव मुल्य (एकत्रित) | **रू. ९३,५०,०००/— अक्षरी त्र्याण्णव लक्ष, पन्नास हजार रूपये फक्त** |  |  |

**महत्वाच्या सुचना :—**

१) **निविदा पाठविण्याचे ठिकाण** :— कार्यालय पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस भवन, पाचवा माळा, सिव्हील लाईन, नागपुर

२) वाहनविक्री निविदा फॉर्म, नियम व अटीं, आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस भवन, पाचवा माळा, सिव्हील लाईन, नागपुर येथे कार्यालयीन वेळेत मिळतील. तसेच सदर निविदा फॉर्म मा.पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे अधिकृत वेबसाईट https://nagpurpolice.gov.in/PressRelease.html या वर उपलब्ध आहे.

३) वाहन अनु क्रं. ०१ ते ०९ हे पोलीस मुख्यालय, नागपुर शहर व क्रं. १० ते १४ हे पोलीस ठाणे सदर येथे ठेवण्यात आले आहे, पोलीस निरीक्षक श्री विवेकानंद राऊत, मोबाइल क्रं. ७०२८८०८००७ अथवा सफौ अनिल त्रिवेदी, मो.क्र. ९५४५५६५१५६ यांचेशी संपर्क साधून **दिनांक ०९.१०.२०२६** पासुन पहावयास मिळतील.

४) वाहन विक्रीमध्ये भाग घेणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी बंद पाकिटामध्ये विहीत निविदा फॉर्म भरणे आवश्यक आहे, निविदा फॉर्म भरतांना प्रत्येक वाहनाकरीता रजिस्ट्रेशन फी ५०००/– रू. याप्रमाणे अमानत रक्कम भरणे आवश्यक असुन सदरची रक्कम रिफन्डेबल राहील. सदर रक्कमेचा डिमांड ड्राफट व्दारे **"पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, नागपुर शहर"** या नावाने निविदा फॉर्मसोबत दयावायाचा आहे. वाहनासंबंधी निविदा फॉर्म सादर करतांना पाकिटबंद लिफाफावर ठळकपणे वाहन लिलाव निविदा नमूद करावे. **दिनांक १५/११/२०२६ चे १७.०० वा. पर्यत वाहन लिलाव निविदा** सादर करावयाच्या आहेत.

५) निविदा फॉर्मसोबत घेणाऱ्याचा सध्याचा फोटोग्राफ, पॅनकार्ड, आधारकार्ड यासह केवायसी कागदपत्रे छायाकिंत प्रती सेल्फ अटेस्टेड/स्व साक्षांकित करून दयावयाचे आहेत.

६)जाहिर लिलावातील उपरोक्त नमूद वाहनांची एक‍त्रित बाजारमुल्य रक्कम रू. ९३,५०,०००/– अक्षरी त्र्याण्णव लक्ष, पंन्नास हजार रूपये फक्त आहे.

७) निविदा उघडण्याचा **दिनांक १७.१०.२०२६ रोजी ११.३० वाजता** अथवा इतर सोयीस्कर दिवशी कार्यालय पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस भवन, पाचवा माळा, सिव्हील लाईन, नागपुर येथे राहील.

८) वाहनांवरील केसेसची, टॅक्स, विमा व इतर आवश्यक सर्व माहिती ही निविदादाराने स्वत: मिळवायची आहे.

९) निविदा मंजूर झाल्यावर संबंधितांना कळविले जाईल, तद्‌नंतर मंजूर निविदा रक्कमेच्या २५ टक्के रक्कम ताबडतोब भरणा करावा लागेल व उर्वरीत रक्कम ५ दिवसाच्या आंत भरणे क्रमप्राप्त आहे. तसे न केल्यास भरलेली संपूर्ण रक्कम ही जप्त केली जाईल. निविदेप्रमाणे पुर्ण रक्कम भरणा केल्यानंतरच वाहनांचा ताबा देण्यात येईल. वाहनाचा ताबा घेतल्यानंतर वाहनाची सर्वस्वी जबाबदारी ही खरेदीदार यांचीच राहील. सदर वाहन खर्चासह हस्तांतरीत करून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी खरेदीदार यांची राहील.

१०) विहीत मुदतीत वाहनांच्या लिलाव निविदा संख्येने प्राप्त न झाल्यास फेरनिविदा मागविण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल.

११) कोणतेही कारण न देता जाहिर लिलाव स्थगीत किंवा रद्‌द करण्याचा अथवा इतर कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार वाहन लिलाव समिती कडे कायम ठेवण्यात आला आहे.

स्वा/–

**(महक स्वामी) I.P.S.**
**पोलीस उपायुक्त,**
**आर्थिक गुन्हे शाखा, नागपुर शहर**

**वाहतुक शाखा प्रेसनोट :–**

**अ)** नागपूर भाहरात दिनांक ११/१०/२०२६ ते दिनांक २०/१०/२०२६ दरम्यान नवरात्र/दुर्गा उत्सव मोठ्य प्रमाणात साजरा करण्यात येतो. चितारओळ येथे मोठ्या प्रमाणात दुर्गा मुर्ती बनविण्यात येतात. त्यामूळे या रस्त्यावर दुर्गा मुर्तीची ऑर्डर देण्याकरिता मोठ्या प्रमाणात लोकांची आवक–जावक असते आणि चितार ओळ अरूंद असल्यामूळे ये–जा करणाऱ्या वाहनांनी अपघात घडतात आणि बऱ्याच वेळी वाहतूकीची कोंडी निर्माण होते. भावसार चौक ते बडकस चौक दरम्यान वाहतूकीसाठी जवळचा रस्ता म्हणून वाहन चालक चितार ओळीचा वापर करतात त्यामूळे या भागात रहदारीला खुप त्रास होतो. वाहतूक सुरळीत राहावी व नागरीकांना गैरसोय किंवा अडथळा निर्माण होऊ नये म्हणून वाहतूक नियमन करण्याचे दृष्टीने वाहतूकीवर निर्बंध घालण्यात आले आहे या संबधी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

अ) बडकस चौकाकडून चितार ओळी मार्गे भावसार चौकाकडे जाणारी एकेरी वाहतुक सुरू ठेवून भावसार चौक ते चितार ओळी मार्गे बडकस चौक अशी वाहतुक बंद करण्यांत आली आहे. सदरचा रस्ता वरील काळासाठी एक दिशा मार्ग (वन–वे) म्हणून जाहीर करण्यात येत आहे.

ब) भावसार चौकाकडून चितार ओळी मार्गे जाणारी वाहतुक भावसार चौक ते गांधी पुतळा चौक मार्गे बडकस चौकाकडे वळविण्यांत येत आहे.

क) बडकस चौक ते शहीद चौक, व शहीद चौक ते बडकस चौकाकडे जाणारी वाहतूक गांधीपुतळा चौक येथे बॅरीकेड्स टाकुन बंद करण्यात येणार आहे. तसेच बडकस चौकाकडुन येणारी वाहतूक चिटणीस पार्क चौक मार्गे अग्रसेन चौकाकडे व शहीद चौकाकडुन येणारी वाहतूक दारोडकर चौकाकडे वळविण्यात येत आहे.

ड) आवश्यकतेनुसार किंवा परिस्थितीनुसार वेळेवर योग्य मार्गाने वाहतुक वळविण्यांचे अधिकार कर्तव्यावरील वाहतुक शाखेच्या पोलीस अधिकाऱ्यांना प्रदान करण्यांत आले आहेत.

**नमूद अधिसूचना दिनांक ११/१०/२०२६ चे सकाळी ०६.०० वा. पासून दिनांक १२/१०/२०२६ चे सकाळी ०७.०० वाजे पावेतो अंमलात राहील.**

तरी सर्व नागरिकांना विनंती करण्यात येते की, सुलभ वाहतूकीकरिता आणि वाहतूकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून उपरोक्त प्रमाणे काढण्यात आलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता सहकार्य करावे आणि आपली होणारी गैरसोय टाळावी.

**ब)** नागपूर शहरात दिनांक ११/१०/२०२६ पासून ते दिनांक २०/१०/२०२६ पावेतो नवरात्र उत्सव साजरा होणार आहे. त्या दरम्यान "आग्याराम देवी" चे दर्शनाकरिता भावीक मोठ्या संख्येने दर्शनाकरिता येतात. त्यामूळे वाहतूकीची कोंडी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागपूर शहरातील वाहतूक सुरळीत राहावी, सामान्य नागरिकांना धोका, गैरसोय किंवा अडथळा निर्माण होवू नये म्हणून खालीलप्रमाणे वाहतूकीवर निर्बंध घालण्याकरिता अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

दिनांक ११/१०/२०२६ पासून ते दिनांक २०/१०/२०२६ पर्यंत दररोज सकाळी ०५.०० वाजता पासून १२.०० वा. पर्यंत व दुपारी १५.०० वाजता पासून रात्री २३.०० वा. पर्यंत जाधव चौक ते आग्याराम देवी चौक या मार्गावरील सायकल व सायकलरिक्षा सह सर्व प्रकारच्या वाहनाच्या वाहतूकीवर दोन्ही बाजुने बंदी घालण्यात येत आहे.

**उपरोक्त मार्गावर येणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

अ) कॉटन मार्केट चौकाकडून आग्याराम देवी मंदीराकडे येणारी वाहतूक सरळ पुढे गणेश मंदीर चौक मार्गे टिळक पुतळ्याचे दिशेने तसेच आग्याराम देवी चौकातुन रामन टी पॉईन्टचे (एम्प्रेस मॉल) दिशेने जाईल.

ब) टिळक पुतळयाकडून आग्याराम देवी चौक मार्गे मंदीराकडे येणारीं वाहतूक सरळ पुढे कॉटन मार्केट चौकाचे दिशेने तसेच आग्याराम देवी चौकातुन रामन टी पॉईन्टचे एम्प्रेस मॉलचे दिशेने जाईल.

क) बैद्यनाथ चौकाकडून जाधव चौक मार्गे आग्याराम देवी मंदीराकडे येणारी वाहतूक जाधव चौकातून मोक्षधामचे दिशेने तसेच मॉडेल मिल चौकाचे दिशेने जाईल.

ड) मॉडेल मिल चौकाकडून जाधव चौक मार्गे आग्याराम देवी मंदीराकडे जाणारी वाहतूक जाधव चौकातून मोक्षधामचे दिशेने तसेच बैद्यनाथ चौकाचे दिशेने जाईल.

इ) मोक्षघाम कडून जाधव चौक मार्गे आग्याराम देवी मंदिरा कडे जाणारी वाहतुक जाधव चौकातुन मॉडेल मिल चौकाच्या दिशेने तसेच बैद्यनाथ चौकाचे दिशेने वळविणे आवश्यक आहे.

नमूद अधिसुचना दिनांक ११.१०.२०२६ ते दिनांक २०.१०.२०२६ पर्यंत अमलात राहील.

तरी सर्व नागरिकांना विनंती करण्यांत येते की, सुलभ वाहतुकी करिता आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून उपरोक्त प्रमाणे काढण्यांत आलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता सहकार्य करावे आणि आपली होणारी गैरसोय टाळावी.

**क)** नागपूर शहरात दसरा व देवी उत्सव दिनांक ११.१०.२०२६ ते २१.१०.२०२६ पावेतो साजरा होत आहे. कोराडी येथील श्री. महालक्ष्मी देवी मंदीर येथे यात्रा व महोत्सव वरील काळात आयोजित करण्यात आलेला आहे. त्यामुळे नागपूर शहर व जवळपासचे परिसरातील व लांब ठिकाणाहून आलेल्या भाविकांची गर्दी फार मोठया प्रमाणात देवी दर्शनाकरीता होते. त्यामुळे सदर भाविक येण्या जाण्यासाठी दुचाकी/चारचाकी वाहनांचा वापर करतात. त्यामुळे मानकापूर फाटा ते नांदा फाटा पावेतो वाहतूक नियमन व नियंत्रण करणे आवश्यक होवून दुर्घटना घडण्याची दाट शक्यता आहे. नागपूर शहरातील वाहतूक सुरळीत राहावी, सामान्य नागरीकांना धोका, गैरसोय किंवा अडथळा निर्माण होवू नये म्हणून वाहतूकीवर निर्बंध घालण्याकरीता खालील अधिसुचना काढणेत आली आहे. या संबधी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली असून दिनांक ११.१०.२०२६ ते २१.१०.२०२६ पावेतो अधिसुचना अंमलात राहील.

**नागपूर शहरातील रिंगरोडवरील मानकापूर चौक ते नांदा फाटा पावेतो तसेच नांदा फाटा ते मानकापुर चौक पर्यंत जड वाहनांस जाण्या–येण्यास दिनांक ११.१०.२०२६ ते २१.१०.२०२६ पावेतो रोडवर जडवाहनाच्या वाहतूकीवर (अत्यावश्यक सेवा वकळून) निर्बंध घालण्यात आले आहे.**

**वाहतूक वळवण्याचे मार्ग** –

**१)** वर्धा मार्गे व्हाया नागपूर–छिंदवाडा–भोपाल व त्यापुढे जाणारे सर्व प्रकारचे जड वाहने डोंगरगाव मार्गाने सरळ जामठा मार्गे आक्सीजन बर्ड पार्क येथुन डावे वळण घेवुन आउटर रिंगरोडवरून एन.आय.टी हॉस्पिटल, झिरो सर्कलने खडका टोल नाका मार्गे गोंडखैरी येथुन कळमेश्वर–सावनेर पासुन डावे वळण घेवुन छिंदवाडा, भोपाल व त्यापुढे जातील.

**२)** अमरावती मार्गे मध्यप्रदेश (छिंदवाडा, बैतुल, भोपाल) व त्यापुढे जाणारे सर्व प्रकारचे जड वाहन गोंडखैरी येथुन डावे वळण घेवुन कळमेश्वर–सावनेर येथुन डावे वळण घेवुन छिंदवाडा, बैतुल, भोपाल व त्यापुढे जातील.

**३)** भोपाल, बैतुल व छिंदवाडा (मध्यप्रदेश) कडुन नागपूर, अमरावती कडे जाणारे सर्व प्रकारचे जड वाहने सावनेर मार्गे कळमेश्वर, गोंडखैरी येथुन उजवे वळण घेवुन अमरावती कडे जातील.

**४)** भोपाल, बैतुल, छिंदवाडा कडुन नागपूर कडे येणारे सर्व प्रकारचे जड वाहन सावनेर येथुन उजवे वळण घेवुन कळमेश्वर या मार्गाचा वापर करतील.

**५)** भोपाल, बैतुल, छिंदवाडा कडुन वर्धा,चंद्रपुर कडे जाणारी सर्व प्रकारची जड वाहने सावनेर येथुन उजवे वळण घेवुन कळमेश्वर, गोंडखैरी मार्गे खडका टोल नाका मार्गे झिरो सर्कलने एन.आय.टी. हॉस्पीटल येथुन आउटर रिंगरोडवरून ऑक्सीजन बर्ड पार्क मार्गे जामठा येथुन डोंगरगाव मार्गाने वर्धा, चंद्रपुर, हैद्राबाद कडे जातील.

**६)** भोपाल, बैतुल, छिंदवाडा कडुन उमरेड रोड, भंडारा, रायपुर व जबलपुर कडे जाणारे सर्व प्रकारचे जड वाहन दहेगाव फाटा येथुन डावे वळण घेवुन खापरखेडा मार्गे आशा हॉस्पीटल येथुन उजवे वळण घेवुन आउटर रिंगरोड ने उमरेड, भंडारा, रायपूर व जबलपूर कडे जातील.

**७)** उमरेड रोड, भंडारा, रायपुर कडुन भोपाल, बैतुल, छिंदवाडा कडे जाणारे सर्व प्रकारचे जड वाहने आउटर रिंगरोड वरून आशा हॉस्पीटल येथुन डावे वळण घेवुन खापरखेडा मार्गे दहेगाव टि—पॉईंट येथुन उजवे वळण घेवुन राष्ट्रीय महामार्गावरून सावनेर, भोपाल व छिंदवाडा कडे जातील.

**८)** जबलपूर कडुन बैतुल, भोपाल, छिंदवाडा कडे जाणारी जड वाहन आमळी फाटा येथुन उजवे वळण घेवुन पारशिवनी मार्गे खपरखेडा वरून उजवे वळण घेवुन दहेगाव टि पॉईंट येथुन उजवे वळण घेवुन राष्ट्रीय महामार्गावरून सावनेर,भोपाल व छिंदवाडा कडे प्रस्थान करतील.

९) वर्धा मार्गे व्हाया नागपूर—जबलपूर व त्यापुढे जाणारे सर्व प्रकारचे जड वाहने डोंगरगाव मार्गाने सरळ जामठा मार्गे आक्सीजन बर्ड पार्क, सरळ राणीकोठी च्या अलीकडून डावे वळण घेवुन आउटर रिंगरोडवरून पांजरा टोल नाका, कापसी पुलीया, कन्हान नदी ब्रिज वरून आउटर रिंगरोड जबलपूर कडे जातील.

१०) नागपूर कडून सावनेर मार्गे छिदवाडा भोपाल कडे जाणारी जड वाहन मानकापूर चौकातून डावे वळन घेउन गोरेवाडा चौक, नवीन काटोल नाका चौक, फेटरी, कळमेश्वर, ब्राम्ही फाटा, या मार्गाने छिदवाडा भोपाल कडे जातील तसेच मानकापूर चौकातून उजवे वळन घेउन जरीपटका चौक, ऑटोमोटिव्ह चौक, उपल्लवाडी देवी मंदीर, आशा हॉस्पीटल डावे वळन, खापरखेडा, दहेगाव सावनेर मार्गे छिदवाडा, भोपाल कडे जातील व येतांना याच मार्गाने वापर करतील.

**नमूद अधिसूचना दिनांक ११.१०.२०२६ ते २१.१०.२०२६ पर्यंत अंमलात राहील.**

तरी सर्व नागरिकांना विनंती करण्यांत येते की, सुलभ वाहतुकी करिता आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून उपरोक्त प्रमाणे काढण्यांत आलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता सहकार्य करावे आणि आपली होणारी गैरसोय टाळावी.

**ड)** नागपूर शहरात नवरात्र उत्सव हा दिनांक ११/१०/२०२६ ते २०/१०/२०२६ पर्यन्त साजरा होणार असून श्री. महालक्ष्मी मंदीर कोराडी येथे नवरात्र उत्सव दरम्यान भाविक मोठया प्रमाणावर बस मधुन तसेच खाजगी बस, मेटॅडोर, जीप, कार, दुचाकी वाहनाने व इतर वाहनांनी येतात. त्यामुळे श्री महालक्ष्मी मंदीराच्या आसपासच्या परिसरात, रस्त्यावरील वाहनांची तसेच भाविकांची प्रचंड गर्दी होवून वाहतूकीची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. वाहतूक सुरळीत राहावी व सामान्य नागरीकांना धोका गैरसोय किंवा अडथळा निर्माण होवू नये म्हणून खालील प्रमाणे वाहतूक नियमन व नियंत्रण करण्याचे दृष्टीने वरील नमुद कालावधीत श्री महालक्ष्मी मंदीराकडे जाणाऱ्या खालील नमुद मार्गावरील वाहतूकीवर निर्बंध घालण्यात आले आहे या संबधी अधिसुचना प्रसिध्द करण्यात असून दिनांक १०/१०/२०२५ चे २०.०० वा. पासुन ते २१/१०/२०२६ पावेतो अधिसुचना अंमलात राहील.

१. नागपूर छिंदवाडा मार्गावरून कोराडी देवी मंदीराचे मुख्य द्वाराकडे जाणाऱ्या मार्गावर सर्व प्रकारचे ऑटो, चारचाकी वाहने, जीप, ट्रक्स, मॅटाडोर बस गाडया यांना प्रवेशास बंदी राहील.

**(अ)** वरील प्रमाणे प्रवेशास बंदी घालण्यात आलेली वाहने (दुचाकी सोडुन) छिंदवाडा मार्गावरून नांदा वस्ती येथून उजवे बाजूला खापरखेडा मार्गाने कोराडी देवी मंदीराकडे अस्थायी बनविण्यात आलेल्या बस स्टॅड पर्यन्त सोडल्या जातील व तेथून ते त्याच मार्गाने परत येतील.

**(ब)** ऑटोरिक्षा (तीन आसनी व सहा आसनी) यांचे करीता पुलाच्या अलीकडे डाव्या बाजूस अस्थायी ऑटो स्टॅन्ड दिलेले असुन ऑटोरिक्षांना पुलावरून जाण्यास बंदी घालण्यात आली आहे.

२. नांदा फाटा मार्गे कोराडी देवी मंदीराकडे दर्शनासाठी जाणारे सर्व प्रकारच्या दूचाकी वाहनांना (खापरखेडा कडे जाणाऱ्या दूचाकी वाहनां व्यतिरिक्त) बंदी घालण्यात आलेली आहे.

३. नांदा फाटा मार्गे कोराडी देवी मंदीराकडे दर्शनासाठी जाणारे सर्व प्रकारच्या दूचाकी वाहनांना (खापरखेडा कडे जाणाऱ्या दूचाकी वाहनां व्यतिरिक्त) बंदी घालण्यात आलेली आहे.

४. खापरखेडा कडून कोराडी देवी मंदीराकडे दर्शना करीता जाणारे सर्व प्रकारच्या दूचाकी वाहनांना बंदी घालण्यात आलेली आहे. त्यांनी अण्णा मोड येथून आपले वाहन डावे वळन घेउन पंप हाउस टि—पॉईन्ट येथून सरळ पार्कीगकडे जातील

५. नांदा फाटा व खापरखेडा येथून कोराडी देवी मंदीराकडे दर्शना करीता जाणारे भावीक नवैद्यम हॉटेल जवळून डावे वळन घेउल सरळ भवन्स स्कूल मार्गे पंप हाउस टि—पॉईन्ट येथून उजवे वळन घेउन पार्कींगकडे जातील.

६. नागपूर छिंदवाडा राष्ट्रीय महामार्ग वरून कोराडी देवी मंदीराकडे जाणाऱ्या मार्गावर सायकल व सर्व प्रकारची वाहने नांदा तलाव येथून सर्विस रोडचा वापर करून नांदा फाटा (विसर्जन पॉईन्ट अंडरबिज ) वरून उजवे वळन घेवून नंतर कोराडी तलावाचे डावे वळन घेउन सरळ भवन्स स्कूल मार्गे पंप हाउस टि—पॉईन्ट येथून उजवे वळन घेउन पार्कीगकडे जातीलकृ

१. आवश्यकतेनुसार वेळ प्रसंगी इतरत्र वाहतूक वळविण्याचे अधिकार वाहतूक शाखेचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येत आहे.

**नमूद अधिसुचना हि दिनांक १०/१०/२०२६ चे २०.०० वा. पासुन ते २१/१०/२०२६ पावेतो अंमलात राहील.**

तरी सर्व नागरिकांना विनंती करण्यांत येते की, सुलभ वाहतुकीकरिता आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून उपरोक्त प्रमाणे काढण्यांत आलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता सहकार्य करावे आणि आपली होणारी गैरसोय टाळावी.

स्वा/—

**( आदित्य मिरखेलकर, भापोसे )**
पोलीस उप आयुक्त, वाहतूक
नागपूर शहर